# मेट्रो रुळांसाठी एल अँण्ड टीची निवड

**मुंबई** : मेट्रो ३ च्या बीकेसी ते कफ परेड स्थानकांदरम्यान मेट्रो रुळांची बांधणी करण्याचे कंत्राट लार्सन अँण्ड टुब्रो कंपनीला दिले आहे. अपलाईन तसेच डाऊनलाईन मिळून ४७ किमी रूळ बांधण्यात येणार आहे. या कंत्राटांतर्गत रूळ उभारणी, रुळांची खरेदी आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंग या कामांचा समावेश राहणार आहे. हाय अँट्यूनेशन ट्विन ब्लॉक स्लिपन या अद्ययावत तंत्रज्ञानाचा भारतीय मेट्रोमध्ये पहिल्यांदाच वापर करण्यात आला आहे. एमएमआरसीएलचे प्रकल्प संचालक व प्रभारी व्यवस्थापकीय संचालक सुबोध गुप्ता यांनी ट्रॅक हा महत्त्वाचा घटक असून ऐतिहासिक वारसा इमारती असल्याने अत्याधुनिक ट्रॅक यंत्रणा प्रकल्पासाठी वापरणार आहोत, असे स्पष्ट केले आहे.